आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

२३ सप्टेंबर २०२४ -सोमवार

**ठळक बातम्या**

- घाऊक बाजारात कांद्याची आवक वाढवण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न

- मराठा आरक्षण आणि धनगर आरक्षणाच्या मागणीसाठी आजं राज्यात बंदची हाक / ठिकठिकाणी निदर्शनं

- २०२५ मधे ऑस्करच्या शर्यतीत भारताचं प्रतिनिधित्व “लापता लेडीज” करणार

- अमरावतीत खासगी बस नदीत कोसळून झालेल्या अपघातात ४ जण ठार तर २५ जण जखमी

**आणि**

- मुंबईसह राज्याच्या विविध जिल्ह्यांत जोरदार पावसाची हजेरी

**<><><><><>**

कांद्याचे दर कमी करण्यासाठी सरकार घाऊक बाजारात कांद्याची आवक वाढवणार आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. कांद्याचा पुरेसा साठा असून खरीप हंगामात चांगली पेरणी झाली आहे. त्यामुळे कांद्याचे दर लवकरच कमी हो◌ेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकार किरकोळ बाजारात प्रतिकिलो ३५ रुपये दरानं कांदाविक्री करत आहे. या आठवड्यापासून

देशातल्या प्रमुख शहरांमधे अनुदानित दराने कांदाविक्री सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

जगातल्या प्रत्येक क्षेत्रात विकासासाठी तंत्रज्ञानाची आवश्यकता असून तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अमेरिका दौऱ्यात न्यूयार्कमध्ये अमेरिकेतल्या तंत्रज्ञान क्षेत्रामधल्या आघाडीच्या कंपन्यांच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांची गोलमेज परिषद प्रधानमंत्री मोदी यांनी घेतली. तिथे ते बोलत होते. अमेरिकेतला भारतीय समुदाय म्हणजे भारताचे सदिच्छा दूत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. न्यूयॉर्कमधील लाँग आयलंड इथं भारतीय समुदायातर्फे आयोजित कार्यक्रमात सांगितलं. बोस्टन आणि लॉसएंजलिस इथं दोन भारतीय दूतावास सुरू केले जातील, अशी घोषणा प्रधानमंत्र्यांनी या वेळी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज न्यूयॉर्कमध्ये भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे कुवेतचे राजपुत्र शेख सबाह अल-खालिद अल-सबाह यांच्याशी तसंच नेपाळचे प्रधानमंत्री के. पी. शर्मा ओली यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. सीईओ राऊंडटेबल या कार्यक्रमात त्यांनी उद्योजकांशी चर्चा केली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. दुसऱ्या टप्प्यात रियासी, राजौरी, पूंछ, श्रीनगर आणि बडगाम या पाच जिल्ह्यांमधल्या २६ मतदारसंघांसाठी येत्या

बुधवारी२५ सप्टेंबर रोजी मतदान होईल. येत्या ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होईल.

**<><><><><>**

निवडणूक आयोगाचं पथक २६ ते २८ सप्टेंबर या दरम्यान महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहे. या काळात राज्यातले विविध राजकीय पक्ष, राज्य निवडणूक आयोग, सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत आयोगाचं पथक बैठक घेणार आहे. २८ सप्टेंबरला मुंबईत आयोगाची वार्ताहर परिषद होईल. यात राज्यातल्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरु असून मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील गेले काही दिवसांपासून आंतरवली सराटीत उपोषण करत आहेत. तसंच धनगर आरक्षणासाठी धनगर समाजाचे नेते आणि पदाधिकारीही वेगवेगळ्या ठिकाणी उपोषणाला बसले आहेत. सकल मराठा समाजाचे काही नेत्यांनी पंढरपुरात येऊन धनगर समाजाच्या मागण्यांसाठी उपोषण करत असलेल्या धनगर नेत्यांची भेट घेतली. जरांगे पाटील यांनी धनगर एसटी आरक्षणाला आपला पाठिंबा याआधीच जाहीर केला आहे.

नांदेडमधल्या सकल मराठा समाजाने आज नांदेड बंदची हाक दिली आहे. नांदेड बंदच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरातल्या काही शाळाही बंद रहाणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

**अहमदनगर** जिल्ह्यातल्या अखंड मराठा समाजाच्यावतीने आज जिल्हा बंद पुकारण्यात आला आहे. जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून सकल मराठा समाजाच्या वतीने नगर तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरु आहे.

**वसमत** इथं एका युवकाने आज आत्महत्या केली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही आपली शेवटची इच्छा असल्याचं त्यानं चिठ्ठीत लिहीलं असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

**परभणी** जिल्ह्यात आज विविध ठिकाणी आज धनगर समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आलं. धनगड या जमातीचे राज्यात लोक राहत नसून धनगर या जातीचे लोक राहत त्यामुळे धनगड ऐवजी धनगर शब्द वापरून धनगर समाजाला केंद्र आणि राज्यात एस टी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या मागणीसाठी पूर्णा, पालम, गंगाखेड, झरी, पाथरी अशा विविध 11 ठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात आले, याला चांगला प्रतिसाद मिळाला असून धनगर समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**<><><><><>**

पुढच्या वर्षी म्हणजेच २०२५ मधे होणाऱ्या अकादमी पुरस्कार सोहळ्यासाठी भारताकडून लापता लेडीज हा चित्रपट पाठवण्यात येणार आहे.

किरण राव दिग्दर्शित हा चित्रपट बेस्ट फॉरेन फिल्म विभागात भारताचं प्रतिनिधित्व करेल, असं भारतीय चित्रपट महासंघाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यात मेळघाटातल्या सेमाडोह परिसरात आज खासगी बस पुलावरून नदीत कोसळून झालेल्या अपघातात ४ जण ठार तर २५ जण जखमी झाले. यापैकी ७ जणांची प्रकृती गंभीर आहे. ही बस अमरावतीहून धारणीच्या दिशेने प्रवास करत होती. चालकाचं नियंत्रण सुटल्याने बस पुलावरून नदीत कोसळल्याची माहिती मिळत आहे. बसमधले अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी आणि पोलीस पथक मदतकार्य करत आहेत.

**<><><><><>**

राज्यात कालपासून पुन्हा पावसाने हजेरी लावली आहे. राजधानी मुंबई आणि उपनगर परिसरात पावसाच्या जोरदार सरी अधूनमधून येत आहेत. **सांगली जिल्ह्यात तासगाव, पलूस, मिरज, कवठेमहांकाळ आणि वाळवा** तालुक्यात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला असून ओढे, नाले भरून वाहू लागले आहेत.

**कोल्हापूर** जिल्ह्याला काल परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली. कोल्हापूर शहरात रात्री  उशिरा झालेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी सखल भागात पाण्याची तळी साचली. या पावसाने पिकांना चांगलाच दिलासा मिळाला असून शेती कामालाही वेग आला आहे. जिल्ह्यात घाटमाथ्यावर राधानगरी, करवीर, शाहूवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, गगनबावडा तालुक्यासह गडहिंग्लज, चंदगड आणि आजरा तालुक्यातही जोरदार पाऊस झाला. १५ दिवसांच्या विश्रांतीनंतर **अमरावती** शहरासह जिल्ह्यात पुन्हा

एकदा पावसाने हजेरी लावली आहे. काल मध्यरात्रीपासून आज दुपारी १२ पर्यंत जिल्ह्याच्या बहुतांश ग्रामीण भागात तर काल सायंकाळी ४ वाजल्या पासून अमरावती शहरात पाऊस झाला. सोयाबीन पिकाला या पावसाचा चांगलाच फायदा होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. वर्धा नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस होत असल्याने प**श्चिम विदर्भातल्या अप्पर वर्धा धरणाचे** १३ पैकी ९ दरवाजे काल रात्री उघडण्यात आले. त्यामधून ५१४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात होत आहे. **राज्यात** सर्वत्र आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये राज्यातल्या विविध प्रश्नांवर जवळपास ३० मिनिटं चर्चा झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन्ही नेत्यांमध्ये झालेली ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत विधानसभा निवडणूक विशेषत: मुंबईतल्या काही मतदारसंघांच्या संदर्भात चर्चा झाली असल्याची माहीती आहे.

**<><><><><>**

हंगेरीत बुडापेस्ट इथं ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये ऐतिहासिक दुहेरी सुवर्णपदकं जिंकणाऱ्या भारतीय संघाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. देशाच्या क्रीडाक्षेत्रातल्या पराक्रमाचा हा नवा अध्याय असून हे यश

इतर बुद्धिबळ पटूंना प्रेरणा देईल, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आज एका दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर आले आहेत. केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा ते आज घेत आहेत. तत्पूर्वी आज सकाळी जे. पी. मॉर्गन भारतीय गुंतवणूकदार परिषदेत ते सहभागी झाले होते.

<><><><><>

संपूर्ण जगाचं नेतृत्व करण्यासाठी सक्षम करण्याची जबाबदारी देशाच्या युवाशक्तीवर आहे, असं प्रतिपादन पर्यावरण, वनं आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केलं आहे. मुंबईतल्या नरसी मोनजी शिक्षण संस्थेत विकसित भारतासाठी युवाशक्ती या कार्यक्रमाचा प्रारंभ आज त्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी यादव यांनी ‘एक पेड माँ के नाम’ अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमातही भाग घेतला.

<><><><><>

शेअरबाजारामधल्या व्यवहारांची आज तेजीनं सुरुवात झाल्यानंतर दुपारच्या सत्रातही ती कायम राहिली. शेअर बाजारांच्या संवेदी सूचकांकांनी सकाळीच आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर गाठला. त्यानंतर दोन्ही निर्देशांकांमध्ये वाढ दिसून आली. दुपारच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने ८४ हजार ८८९

चा तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीने २५ हजार ९२७ चा आकडा गाठला.

<><><><><>

राज्यातली जनता आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार , काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांना साथ देण्याच्या मनस्थितीत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं. ते रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण इथं पत्रकारांशी बोलत होते.

<><><><><>

विद्यापीठ अधिसभा निवडणुकीवर पक्षीय राजकारणाचा प्रभाव नसावा असं मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज ते वार्ताहरांशी बोलत होते. मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार विद्यार्थ्यांपेक्षा मालकाचं हित जोपासणारे असल्याची टीका त्यांनी केली.

//<><><><><>//